# Good Work Of Nagpur Rural Police

## कन्हान येथील सराफा व्यापाऱ्यास लुटणारे आरोपी स्थानिक गुन्हे शाखा नागपूर (ग्रामीण) मार्फत जेरबंद

दिनांक १४/०५/२०१७ रोजी गणेशनगर, कन्हान येथील अमित ज्वेलर्स या सराफा व्यापाऱ्याचे दुकानात चार अनोळखी आरोपीतांनी भरदिवसा पिस्तुलीने फायर करुन सराफा व्यापारी अमित गुप्ता यास गंभीर जखमी करुन त्याचे दुकानातील सोन्याचांदीचे विविध दागिने तसेच रोख रक्कम असा एकुण किंमती २१ लाख ४२ हजार रुपयाचा माल जबरीने चोरुन नेला होता.

याच प्रकारची घटना मथुरा येथे लगेचच झाली असल्याने सराफा व्यापाऱ्यांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले व त्यांनी सदर गुन्हयाचा लवकरात लवकर छडा लावून आरोपीतांना जेरबंद करण्यासदंर्भात नागपूर (ग्रामीण) पोलीस अधिक्षक श्री. शैलेश बलकवडे यांना सराफा व्यापाऱ्यांनी निवेदन दिले. परिस्थितीचे गांभीर्य बघून पोलीस अधिक्षक यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे प्रमुख पोलीस निरीक्षक श्री. संजय पुरंदरे यांच्या नेतृत्वात विशेष पथकाची नेमणूक करुन त्या अंतर्गत एकुण ०८ तपास पथके तयार करण्यात आली होती. तसेच त्यांनी स्वत: वेळोवेळी तपासाचा आढावा घेवून गुन्हा लवकरात लवकर उघडकीस आणणे बाबत तपास पथकाला आदेशीत केले.

त्या अनुषंगाने नागपूर ग्रामिणच्या स्थानिक गुन्हे शाखा आणि सायबर सेल तसेच जिल्हयातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी अहोरात्र परिश्रम घेवून गुन्हा उघडकीस आणून आरोपी नामे- **१) योगेश फुलसिंग यादव,** वय २५ वर्षे, रा. कन्हान, नागपूर, ह.मु. रामटेक **२) आर्येन उर्फे नितेश मुन्नेलाल राठोड**, वय २४ वर्षे, रा. कन्हान, नागपूर यांना तसेच त्यांना आश्रय देणारा आरोपी नामे -**३) जितेंद्र उर्फे भुरु मारुती धोटे,** वय ३८ वर्षे, रा. रामनगर, गोंदिया यांना मौजा सुर्याटोला, जि. गोंदिया येथून एक पिस्टल, चार जिवंत काडतूस व लुटून नेलेल्या सोन्याचांदीच्या दागिन्यांसह ताब्यात घेतले. तसेच आरोपी नामे - **४) समीर रमाकांत लुटे**, वय २३ वर्षे, रा. गांधी वार्ड, रामटेक यास नागपूर येथून व आरोपी नामे **५) प्रफुल उर्फे पियुष अंबादास जांगडे**, वय २५ वर्षे, रा. शिवनगर, रामटेक यास नागपूर येथून ताब्यात घेण्यात आले. वर नमूद आरोपीतांकडून नगदी २४,००० रुपये, पाच मोबाईल हॅण्डसेट, एक प्रिस्टल, ४ जिवंत काडतूस व सोन्याचांदीचे दागीने मुद्देमाल जप्त करण्यांत आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही नागपूर ग्रामीण पोलीस अधिक्षक, श्री. शैलेश बलकवडे, अपर पोलीस अधिक्षक श्री. नरसिंग शेरखाने यांच्या मार्गदर्शनाखाली कामठी/काटोलचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. ईश्वर कातकडे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. संजय पुरंदरे, पोलीस निरीक्षक श्री. रविंद्र गायकवाड, सपोनि श्री. उल्हास भुसारी, सपोनि श्री. पुरुषोत्तम अहेरकर आणि पोलीस कर्मचारी श्री. लक्ष्मीप्रसाद दुबे, श्री. राजेश सनोढिया, श्री. सुरज परमार, श्री. अजय तिवारी,

श्री. शैलेश यादव, श्री. चेतन राउत, श्री. अमोल कुथे, श्री. सचिन किनेकर, श्रीमती संगीता वाघमारे, श्री. अमोल वाघ तसेच पोलीस मुख्यालय, नागपूर ग्रामीण येथे श्री. उमेश मोहुर्ले, श्री. सचिन सलामे, श्री. कमलाकर कोहळे, श्री. राजकुमार सातुर, श्री. कार्तीक पुरी, श्री. मदन आसतकर, श्री. दिलीप लांजेवार, श्री. प्रणय बनाफर, श्री. निलेश बर्वे यांनी अथक परिश्रम करुन यशस्वीरीत्या पार पाडली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन कन्हानचे ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री. रविंद्र गायकवाड हे करीत आहे.



पोलीस अधिक्षकसह स्था.गु.शाखा व सायबरसेलचे पोलीस तपास पथकातील

अधिकारी व कर्मचारी हे कन्हान येथील जबरी चोरीतील पाच अटक आरोपीतांसह

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**